International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.11 No.4 March – April 2024

# भारतीय लोकशाही समोरील आव्हाने

**डॉ. दिनकर संतुकराव कळंबे**
*प्राध्यापक, संशोधक मार्गदर्शक*
*राज्यशास्त्र विभागप्रमुख, मोरेश्वर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, भोकरदन जि. जालना 431114.*
***Corresponding Author - डॉ. दिनकर संतुकराव कळंबे***
**DOI - 10.5281/zenodo.10873399**

**गोषवारा**:

*भारत हा जगातील सर्वात मोठी लोकशाही व्यवस्था असलेला देश. 97 कोटी मतदार हे 2024 च्या लोकसभा निवडणूकीत भाग घेणार आहे. भारतीय लोकेशाही उत्तरोत्तर आपली प्रगती करीत आहे. भारतीय लोकशाहीची सुरुवात 1950 मध्ये झाली, त्याआधी इंग्रजांनी तिची पाळेमुळे भारतात खोलवर रुजवली होती. तरीही भारतात लोकशाही चालेल की नाही, याबाबत घटनाकर्ते, भारतीय शासनकर्ते यांना शंकाच होती. कारण भारत एक विशाल देश, लोकसंख्या अधिक, विविध भाषा, धर्म, जाती, पंथ यामुळे या सर्वांचा शासनाकरिता एकसंघ बांधणी करण्याचे कठीणच काम होते मात्र याच लोकशाही व्यवस्थेने ते यशस्वी पेलले व आज, भारतालाच नाही तर जगालाही विश्वास वाटेल अशी लोकशाही व्यवस्था निर्माण करून यशस्वीपणे चालविली. अनेक लोकेशाही देशांत ही व्यवस्था निरंतरपणे चालू शकली नाही. याची अनेक उदाहरणे आहेत. उदाहरणार्थ पाकिस्तान, म्यानमार, इजिप्त, अरबी राष्ट्र. भारतात मात्र ती निरंतर व यशस्वीरीत्या पुढे जात आहे. याचे श्रेय निश्चितच घटना व भारतीय जनतेला द्यावे लागेल. भारतीय संविधान हे जगातील अद्वितीय व लोकाभिमुख आहे. त्यामुळे भारताचा विकास शक्य माहे. भारतीय लोकशाही निरंतर चालवायची असेल तर भारतीय लोकशाहीचे संभाव्य धोके, तिच्यासमोरिल आहाने आपल्याला ओळखावी लागतील व तिचे रक्षण करावे लागेल.*

***Keywords**: धार्मिक कट्टरतावाद, लिंगभेद, राजकिय हिंसा, नक्षलवादी चळवळ, राजकारणाचे गुन्हेगारिकरण.*

**संशोधनाची उद्दिष्टे :**

1. भारतीय लोकशाही म्हणजे काय ?याची रचनास्वरूप व वैशिष्टयांचा अभ्यास , ,करणे
2. भारतीय लोकेशाही व सद्य:स्थिती अभ्यासणे ,
3. भारतीय लोकशाही समोरील आव्हानांचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धत:**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी संशोधकाने वर्णनात्मक व विश्लेषणात्मक पद्धतीचा अवलंब केला आहे. सामाजिक शास्त्रात कोणत्याही

विषयावर संशोधन करीत असताना केवळ एकाच पध्दतीचा अवलंब करणे अशक्य असते. यास सदरील विषय अपवाद नाही. संशोधन पेपरसाठी प्राथमिक व द्वितीय साधनांचा वापर केला गेला आहे. प्राथमिक साधनात लोकशाही निर्मितीचा इतिहास, विविध देशांच्या प्राचीन शासन संस्थांची माहिती संकलित केली व द्वितीय साधनात विविध देशांच्या शासनसंस्था व त्यांच्या कारभारावर आधारित विविध राज्यघटना, नियम व त्यासाठी उपलब्ध असणारे ग्रंथ, मासिके, साप्ताहिके, नियतकालिके इत्यादींचा समावेश केला आहे.

**लोकशाहिचा अर्थ आणि स्वरूप :**

माल्कन वायली यांच्या मते, 'स्थळ काळ परिस्थितीनुसार लोकशाही निकसित होते आणि त्यात सतत परिवर्तन होत असते. म्हणून ती एक गतीमान संकल्पना आहे. फ्रेंच राज्यक्रांतीनंतर उदयास आलेले स्वातंत्र्य, समता व बंधुभावाची लोकशाही तत्वे आणि औद्योगिक क्रांतीतून उदयास आलेली भांडवलशाही या परस्परविरोधी विचारसरणी विकसित होत गेल्या. या दोन्ही विचारसरणी राज्यशासन, समाजव्यवस्था राजकीय मूल्ये, राजकीय नियंत्रण इत्यादींच्या भिन्न दृष्टीकोनातून विचार करतात. लोकशाही विचारसरणीचा भर शांततामय व सनदशील मार्गाने हळूहळू परिवर्तन करण्यावर असतो. मानवाचे सुख व न्याय अंतिम साध्य मानून त्याला स्वतःचा विकास करून घेणे शक्य व्हावे, अशी स्थिती निर्माण करणे, हे लोकशाहीचे उदीष्ट असते. यावरून लोकशाही ही अतिशय व्यापक संकल्पना आहे, हे स्पष्ट होते. लोकशाही संकल्पना स्पष्ट होण्यासाठी शासनसंस्था वा सरकार हे लोकशाही स्वरुपाचे असावे लागते. सरकार हे जनतेकडून प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे निवडलेले व जनतेला जबाबदार असावे लागते. एकूणच लोकशाहीत विशाल व उदात्त दृष्टीकोण अपेक्षित असतो.

**लोकशाही व्याख्या :**

1. प्रालोकशाही हे केवळ " - लास्की . तर ते ,शासनाचेच एक स्वरूप नाही राज्याचे तसेच ,समाजाचेआर्थिकनैतिक , ".व्यवस्थेचे सुद्धा एक स्वरूप आहे
2. अब्राहम लिकंन लोकशाही हा " -: लोकांनी व लोकांसाठी ,लोकांचे चालवलेला शासन प्रकार आहे"

**भारतीय लोकशाही समोरित आव्हाने:**

**धार्मिक कट्टरतावाद:**

अलीकडील काळात भारतात धार्मिक कट्टरता मोठी वाढली आहे. त्यामूळे मोठा संघर्ष निर्माण होण्याची शक्यता वाढत आहे. प्रत्येक धर्माचे अनुयायी कट्टरतेकडे गेलेले दिसतात. यातही हिंदू मुस्लिम समुदाय अधिक कट्टर वाटत आहे. यातही प्रत्येकाला आपला धर्म संकटात आहे, असेच वाटते.

**लिंगभेद:**

राजकारणात स्वातंत्र्याच्या 75 वर्षानंतरही महिलांना पाहिजे त्या प्रमाणात आजही विधिमंडळ तसेच संसदेत स्थान मिळू शकले नाही. भारतीय लोकशाहीत लोकसंख्येच्या प्रमाणात सहभाग मिळाला नाही. जोपर्यंत योग्य प्रमाणात महिलांचा सहभाग होत नाही. तोपर्यंत भारतीय लोकशाही यशस्वी झाली असे म्हणता येणार नाही, हे भारतीय लोकशाहीसमोर एक आव्हानच म्हणावे लागेल.

**राजकारणाचे गुन्हेगारीकरण :**

लोकशाही म्हणजे कायद्याचे राज्य व कायदेमंडळ म्हणजे देशाचे कायदे करणारे सर्वोच्च कायदे मंदिर. पण याच पवित्र मंदिरात पाठीशी हजारो गुन्हयांची नोंद असणाऱ्या व्यक्तीच जेव्हा कायदे तयार करतात यासारखी लोकशाहीची क्रुर थट्टा जगात अन्य कोठेही झाली नसेल. राजकारणाचे गुन्हेगारीकरण व गुन्हेगारांचे राजकारण सर्वसामान्य सुजान नागरिकास अस्वस्थ करते.

**नक्षलवादी चळवळ :**

आज भारतीय राजकारणात निवडणूकीत लागणारा बेसुमार खर्च आणि वाढते गुन्हेगारीकरण यामूळे समाजात वाढणारी आर्थिक विषमता यामूळे बरेच नागरिक हे नक्षत्रवादी चळवळीत सहभागी होताना दिसत आहे. त्यामूळे भारतीय लोकशाही समोर नक्षलवाद चळवळ हे एक मोठे आव्हान आहे.

**वाढती लोकसंख्या :**

भारतीय लोकशाही समोरिल सर्वात मोठे आव्हान वाढती लोकसंख्या हे आहे. जी निरंतर वाढत आहे. सरकारने कुटुंब नियोजनासारखे खूप प्रयत्न केले, तरीही तिचा वाढण्याचा वेग अधिक असल्याने ती कशी थांबवावी, ही समस्या सरकारसमोर उभी आहे. आज जागतिक स्तरावर भारताचा लोकसंख्येत दुसरा क्रमांक आहे. एकूण जगाच्या लोकसंख्येने दुसरा क्रमांक आहे. एकूण जगाच्या लोकसंख्येत भारताचा वाटा 17% तर जमीन केवळ 2.5 टक्के एकढीच आहे. साहजिकच याचा भारतीय विकासावर फार मोठा परिणाम होतो

**बेरोजगारी:**

प्रचंड लोकसंख्या, तरुणांची संख्या अधिक, प्रत्येकाच्या हाताला काम मिळालेच पाहिजे हा त्यांचा अधिकार मात्र प्रचंड लोकसंख्या असल्याने शासनाला रोजगार उपलब्ध करणे कठीण झाले आहे. म्हणून भारतीय लोकशाहीसमोर बेरोजगारी हे एक मोठे आव्हान आहे.

**1. प्रांतवाद :**

भारतीय लोकशाही समोरील आणखी एक आव्हान म्हणजे प्रांतवाद आपला भारत हा विशाल देश असून ,प्रादेशिक समतोल साधण्याकरीता घटकराज्य व्यवस्था निर्माण केली .मात्र प्रादेशिक असमतोल प्रांतवाज कमी झाला नाही .उत्तर भारत व दक्षिण भारत हा वाद कायमचा आहे**.** प्रांतवार जर वेळीच थांबला नाही तर भविष्यात लोकशाहीपूढे एक आव्हान ठरू शकते.

**2. राजकीय उदासिनता आणि घराणेशाही:**

राजकारण म्हणजेच समाजातील दीनदलित ,अंध-अपंग ,दुर्बल घटकांच्या विकासाचे पवित्र व्रत आहे आणि हेच आपल्या लोकशाहीचे प्रमुख उद्दिष्ट आहे .असे म्हणतात की ,भारत हा तरुण रक्ताचा कार्यक्षम देश आहे .भारतातील सर्वांत तरुण तुर्क भारतात आहे .मात्र वयाने तरुण असलेल्या आपल्या तरूणाई अपवादानेच राजकारणात आढळते .याचे प्रमुख कारण म्हणजे भारतीय राजकारणातील घराणेशाही .यामुळे तळागाळातील सर्वसामान्य कार्यकर्ता हा शेवटपर्यंत कार्यकर्ताच राहतो .प्रस्थापित नेत्यांची मुले ,सुना ,मुलगी ,पत्नी अधिकार पदावर रूढ होवून राजकीय संस्थानिकांचा जन्म होतो .महाराष्ट्रात अशीच अनेक राजकीय संस्थाने प्रत्येक जिल्ह्यात आढळतात .यामुळेच तरूण कार्यकर्ता राजकारणाकडे पाठ फिरवितो. मतदानाबद्दल आपणास आढळणारी उदासिनता आपणास अंतर्मुख करते .मतदान आपला पवित्र हक्क असून आपले एक मत देशाचे भवितव्य ठरविते ,असे प्रबोधन प्रशासनाला करावे लागते .एवढा प्रपंच करून देखील मतदानाची टक्केवारी अपवादानेच पन्नास टक्यापर्यंत पोहोचते .मग हे अपयश कोणाचे .हा प्रश्न आपणास अंतर्मुख होण्यास भाग पाडतो.

**समारोप:**

लोकशाही समोर असलेल्या आव्हानातून वाट काढून भारतातील लोकशाही बळकट करायची असेल तर लोकशिक्षण ही सर्वांत प्रमुख गरज आहे. जर जनतेचा लोकशाही मार्गावर विश्वास नसेल तर ते असनदशीर आणि बेकायदा मार्गाकडे वळतील. यामुळे अल्पकाळातच लोकशाहीचा अस्त होण्याची शक्यता असते. कितीही अडचणी आल्या, तरी लोकांचा लोकशाहीवरील विश्वास डळमळीत होता कामा नये. आपल्या मागण्या मंजूर करून घेण्यासाठी आणि विरोध व्यक्त करण्यासाठी सनदशीर मार्गाचा अवलंब करण्यावर जनतेची श्रद्धा असणे आवश्यक आहे. स्वतःहून निवडून दिलेले सरकार असले, तरी ते आपले सरकार हीच भावना आहे. जेव्हा एखादे सरकार हे आपले सरकार, माझे सरकार आहे, ही भावना जागृत होत नाही, तोपर्यंत भारतात खऱ्या अर्थाने लोकशाही रुजली, असे म्हणता येणार नाही.

**संदर्भ सूची:**


1. आधुनि राजकीय विचार प्रणाली .डॉ - ,प्रशांत पब्लिकेशन - दिलिपसिंग निकुंभ -2015 जानेवारी ,जळगाव
2. राजकीय सिद्धांत व विश्लेषण, डॉ भास्कर लक्ष्मण भोळे ,पिंपळापूरे पब्लिशर्स कंपनी- .नागपूर
3. राजकीय सिद्धांत व विश्लेषण डॉ -. ना. य. डोळे कॉन्टीनेंटल प्रकाशन पुणे
4. राज्यशास्त्र कोष सुहास .डॉ ,व्होरा .डॉ - दास्ताने रामचंद्र आणि ,पळशीकर कंपनी , .पुणे
5. राज्यशास्त्राची मुलतत्वे ग .चि .प्रा - .नागपूर ,मंगेश प्रकाशन .सी ,घांगरेकर